Historicity Research Journal                                                                 Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN : 2393-8900                                                                 Volume - 2 | Issue - 11 | July – 2016

# मुखेड तालुक्याचे ऐतिहासिक व्यक्तीमत्व

**प्रा. डॉ.सरवदे सुशीलकुमार शंकरराव**
इतिहास विभाग प्रमुख, तेरणा महाविद्यालय,उस्मानाबाद.



### प्रास्ताविक :-

नांदेड जिल्यातील मुखेड एक तालुका असुन मोहनावती नदीच्या काठावर वसलेले एक प्राचीन नगर असुन २०°०० उत्तर अक्षांश ७४°१५ पूर्व रेखांशावर वसलेले आहे"[१] कंधार हे एकेकाळी राष्ट्रकुटांची उपराजधानी असलेले प्राचीन नगर मुखेड पासुन ३६ कि.मी. अंतरावर आहे. या गावचा इतिहास सांगणारी जी साधने उपलब्ध होतात त्यात चालुक्यातील (१२ व्या शतकातील) शिलालेख प्रसिध्द आहे"[२] या गावात प्रचलित असणाऱ्या दंतकथा, येथील मंदीर व शिल्पावेष त्यामुळे राष्ट्रकुट आणि नंतर चालुक्य काळात या शहराचे वैभव किती मोठे हे लक्षात येते. या शहराला प्राचीन नाव मोहनावली असे होते"[३] या शहराला पौराणिक परंपार आहे. लोकस्मृती मध्ये या पौराणिक परंपरा रामायण कालखंडपर्यंत मागे जातात.

या शहराचे प्रमुख आकर्षण म्हणुन येथील दशरथेश्वर मंदीर या मंदीराला महादेव मंदीर असे म्हटले जाते. रामायण कालखंडातील राजा दशरथ या ठिकाणी येवुन हे मंदीर बांधले. या मंदीराजवळ काळा वटवृक्ष होता. वटवृक्षावर बसुन राजा दशरथनाने चुकुन प्राणी समजुन त्यांनी श्रावणबाळाचा वध केला. या कृत्याचा पश्चाताप होवुन महादेव मंदिराची स्थापना केली असे सांगण्यात येते. "[४] श्रावणाचा वध झाल्यानंतर त्यांच्या आईवडीलांनी हे एकुण प्राण सोडले. या ठिकाणी श्रावणबाळ व त्याचे आईवडील यांची समाधी बांधण्यात आली. ती श्रावण कावड म्हणुन प्रसिध्द आहे. हे ठिकाण आजही तेथे दाखविण्यात येते.

येथील दशरथेश्वर मंदीराची वास्तुशास्त्राच्या दृष्टीने रचना डॉ.देगलुर"[५] यांनी आपल्या ग्रंभामध्ये केली आहे. त्याचबरोबर येथील काही शिल्पांचा अभ्यास डॉ.देशमुख"[६] यांनी आपल्या ग्रंथात केला आहे. मध्ययुगीन काळात येथे लिंगायत संप्रदायाचा विरभद्र मठ स्थापन झाला. वैष्णव संप्रदायाचे बालाजी मंदीर स्थापन झाले. विरभद्रमठामध्ये एका प्राचीन मंदिराचे अवशेष अजुनही दिसतात. याशिवाय अलिकडच्या काळातील शनीचे मंदिर प्रसिध्द आहे. या शहरातील दशरथेश्वर मंदिराच्या जवळच एक ऐतिहासिक बारव आहे.

### मुखेड येथील महादेवाचे मंदिर :-

दशरथेश्वर मंदीर या नावाने ओळखले जाणारे हे मंदिर एका उंच अधिष्ठानावर आहे. हे मंदिर बंदिस्त किंवा गुढ मंडपाचे आहे याला तीन प्रवेशव्दार आहेत. मुळ मंदीराची बरीच पडझड झालेली आहे. जीर्णोव्दारात मुळच्या रचनेत बराच फरक झालेला दिसतो. सभामंडपाच्या प्रवेशव्दारवर गजलक्ष्मीची प्रतिमा आहे. सभामंडपातील स्तंभ थोडया निराळ्या धाटणीचे आहेत.

गाभाऱ्यात मधोमध तीन फुट उंचीचे भद्र पीठ असुन त्यावर शाळुका व शिवलिंग आहे. मराठवाडयात अशी रचना कोणत्याही मंदिरात आढळत नाही.

हे मंदिर ज्या ओटयावर (जगतीवर) उभे आहे. तो ओटा तीन फुट उंचीच्या आहे. तो अरुंद असल्यामुळे प्रदक्षिणापथ तयार झाला आहे. अधिष्ठावरील भिंत जी मंडोवर म्हणतात हा भाग प्रेक्षणिय आहे. हिच्या ज्या भागावर शिल्पे कोरलेली असतात त्याला जंघा म्हणतात. इथे जंघा भागावरील शिल्पे उत्कृष्ट आहेत. होट्टलच्या देवळातील शिल्पाच्या कलेच्या दृष्टीने ही सरस आहेत. यामध्ये वृष वाहनशवी, नृत्यगणेश, सप्तमातृका व सरस्वती यांच्या प्रतिका आहेत. सप्तमातृकाही नृत्यमग्न आहेत. त्या अलंकृत आहेत आहेत"[७]

### महादेव मंदिरावरील मूर्ती शिल्प :-

### वृषवाहन मूर्ती :-

शिवपार्वतीच्या मागे नंदी असेल तर ती मूर्ती कृष्णवाहन शिवाची असते या मंदीरावरील ही प्रतिमा अतिशय चांगली असली तरी भंगलेली आहे. त्यामुळे मुर्तीच्या हातात कोणती आयुधे असावीत हे सांगणे कठीण आहे. मूर्तीरचनेवरुन ही मुर्ती कृष्णवाहन शिवाची आहे."[८]

### सरस्वती :-

मुखेड येथील दशरथेश्वर मंदिराच्या जंघाभागावर ही सरस्वतीची प्रतिमा आढळते. सरस्वतीची मूर्ती त्रिभंग असुन सहा हाताची आहे. तिचे तीन हात तुटलेले आहेत. वरच्या उजव्या हातात अक्षमाला दिसते. खालच्या हातात पुस्तक असावे. वरच्या हातातील आयुधे ही काळाच्या ओघात झिजलेली असल्यामुळे निश्चित सांगता येत नाहीत. मूर्ती अलंकृत आहे"[९] सरस्वतीचे वाहन हंस आहे". सरस्वतीच्या पायाखाली हंस आहे त्याची चोच तुटलेली आहे.

### पार्वती :-

पार्वतीची एकच मूर्ती मुखेड येथील महादेव मंदिराच्या जंघा भागावर कोरलेली आहे. ही मुर्ती गोधासना आहे. पार्वतीच्या वरच्या दोन हातात लिंग व कमळ आहे. तर खालचे हात तुटलेले आहेत. ही मुर्ती अप्रतिम असली तरी भंगलेली आहे"[१०]

### जेष्ठादेवी :-

महाराष्ट्रात अक्काबाई म्हणून प्रसिध्द असलेली ही लक्ष्मीचे वडील बहिण होय. समुद्र मंथनाच्या वेळी दोघी बहिणीत ही प्रथम वर आली म्हणुनच हिला जेष्ठा हे नाव मिळाले"[११]

जेष्ठा ही व्दिभूज असुन तिच्या एका हाता निलोत्पल असतो व दुसरा अभय हात मुद्रत असतो. तिच्या जवळ केरसुणी आणि कावळा बसलेला ध्वज असतो. गाढवीणी हे तिचे वाहन होय"[१२] परंतु मुखेड येथील ही जेष्ठादेवी चार हाताची आहे. खालच्या उजव्या हातात तलवार, वरच्या हातात कमल, वरच्या डाव्या हातात पंखा, बॅनर तर खालच्या डाव्या हातात कपाल धारण केलेली आहे. गाढव, बॅनर व निलोत्पल जेष्ठादेवीशी जवळीक दर्शविते, त्यामुळे ही जेष्ठादेवीच असावी"[१३]

### नृत्यमातृका :-

महाराष्ट्रात केवळ नांदेड जिल्हयातच सप्तमातृकाचे शिल्पांकन नृत्याभिनयात केलेले आढळते. म्हणूनच नृत्यमातृका हे या परिसराचे वैशिष्य आहे.

मुखेड येथे महादेव मंदिराच्या जंघाभागावर त्या कोरलेल्या आहेत. त्यातील मातृका नृत्य करताना दिसतात "[१४]

### नृत्यगणेश :-

ही नृत्यगणेश प्रतिमा मुखेडच्या जंघा भागावर आढळते. ही गणेशमुर्ती नृत्याभिनयात उभी असून तिचे दोन्ही हात भंगलेले आहेत. त्यामुळे वर्णन करणे कठीण जाते"[१५]

### मुखेड येथील विरभद्र मठातील मंदिराचे हिल्पावशेष :-

मुखेड येथे विरभद्र मठामध्ये पाठीमागील बाजुस एक प्राचीन मंदिराचे अवशेष दिसुन येतात. अवशेषावरुन मंदिर कशा प्रकारचे होते हे लक्षात येत नाही. चार स्तंभ व वर छत येवढेच शिल्लक आहेत. मंदिरात एक मातृदेवतेचे शिल्प ठेवलेले आहे. या अवशेषाच्या बाजूलाच एक गणेशाची मूर्ती ठेवलेली आहे. दुसरे शिल्प नागराजाचे दिसते.

### मुखेड येथील बारव :-

ही बारव येथील दशरथेश्वर मंदिराच्या उजव्या बाजुस काही अंतरावर ही उत्तराभिमुख अशी बारव आहे. या बारवेची लांबी व रुंदी ५८ x ४९ फुट आहे. प्रवेश केल्यानंतर नऊ पायऱ्या उतरल्यानंतर पहिला सोपान लागतो. येथुन दुसऱ्या सोपानवर उतरण्यासाठी प्रत्येक कोपऱ्यात दोन्ही बाजुनी पायऱ्या ठेवल्या आहेत. या शिवाय उपलब्ध जागेचा शक्य तितका जास्त उपयोग करुन घेता यावा या दृष्टीने पुर्व पश्चिम बाजूस उतरता येईल अशा पायऱ्या ठेवल्या आहेत एकुण या सोपानावरुन बारा जागेवरुन खाली उतरता येते. चार पायऱ्या

उतरल्या की दुसरा सोपान सुरु होतो. येथून तिसऱ्या सोपानवर उतरण्यासाठी वरील प्रकाराने बारांना बाजूनी पायऱ्याची व्यवस्था केलेली आहे. या नंतर चौथा सोपान आहे व तेथुन कुंड सुरु होते.

अशा प्रकारे या तालुक्याने आपली ऐतिहासिक ओळख अबाधित ठेवली आहे.

## संदर्भ सुची


१. नागोराव कुंभार (संपा), संस्कार ग्रामीण महाविद्यालय, वसंत नगर, मुखेड, वार्षिक अंक १९९२-९५. पृ.१००
२. रिती श्रीनिवार आणि शेळके जी.सी इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रिक्ट, १९६८ लेख क्र. २५ पृ. २२८.
३. नागोराव कुंभार (संपा) उपरोक्त पृ. ९५.
४. या आख्यायिका व ही स्थाने यांची माहिती येथील पत्रकार श्री शंकर मुगावे यांनी दिली.
५. देगुलरकर गो.बा. 'टेंपल्स आर्किटेक्चर ॲण्ड कल्चरर ऑफ महाराष्ट्र' पृ.१८
६. देशमुख भगवान 'इकनोग्राफी ऑफ हिंदु टेंपल्स् इन मराठवाडा' पृ.१२७, १३२, १३३.
७. देगलुरकर गो.बा. 'मराठवाडयातील मंदीरे आणि शिल्पे' मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक १९७५, पृ २३, २४.
८. देशमुख भगवान 'मूर्ती शिल्प वैभव', स्थानिक इतिहास आणि साहित्य, एक शोध नांदेड, (संपा-अमिताभ राजन आणि इतर) पृ ६०, ६१.
९. उपरोक्त पृ-६५.
१०. खरे ग.ह.मुर्तीविज्ञान पुणे, १९३९, पृ- १८३.
११. देशमुख भगवान 'इकनोग्राफी ऑफ हिंदु टेपल्स इन मराठवाडा', पृ-१२६.
१२. डॉ.सुनिल पुरी, नांदेड जिल्हयाचे ऐतिहासिक व्यक्तिमत्व शोध प्रबंध पृ.११३.
१३. गोपीनाथराव 'इलिमेन्टस् ऑफ हिंदु इकनोग्राफी', व्हालुम १ पार्ट २, १९६८ (आ.दुसरी) पृ ३९० ते ४०० ( ३९४ ),
१४. देशमुख भगवान 'मूर्ती शिल्प वैभव', स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध नांदेड, पृ ६३.
१५. देंगलुकर गो.ब. 'टेंम्पल्स आर्किटेक्चर ॲण्ड स्कल्पचर ऑफ महाराष्ट्र' पृ १५१, १५२.